# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ८८ - २४** **दिनांक :- १२/०३/२०२४**

## प्रेसनोट

### खुन करुन पळुन गेलेल्या आरोपीस पश्चिम बंगाल येथुन अटक - नवघर पोलीस ठाणेची कामगिरी

दिनांक १०/०१/२०२४ रोजी दारु पिऊन पडलेल्या व डोक्याला जखम असलेला मोहम्मद मुबारक अली याला उपचाराकामी के.ई.एम. रुग्णालय परेल येथे दाखल केले होते व तेथे त्याचेवर दवाउपचार चालु असताना मोहम्मद मुबारक आली हा दि. १४/०१/२०२४ रोजी डॉक्टरांनी मयत झाल्याचे घोषित केले होते. सदरबाबत नवघर पोलीस ठाणेमध्ये अकस्मात मृत्युची नोंद करुन चौकशी सुरु केली होती.

नमुद अकस्मात मृत्युमधील मयत याचे मृत्युबाबत संशयाचा प्रकार असल्याने मा. वरिष्ठांचे आदेशाने अकस्मात मृत्युबाबत तपास चालु असतांना मोहम्मद मुबारक अली व त्याचा साथीदार करीमउल्ला खान यांचेमध्ये भांडण झाले असल्याचे व करीमउल्ला खान हा सदर ठिकाणाहुन पळुन गेला असल्याचे समजले होते. वैदयकीय अहवालावुन व अकस्मात मृत्युच्या केलेल्या चौकशीतुन करीमउल्ला खान याचे विरोधात नवघर पोलीस ठाणे गुरनं ा ४५/२०२४ भा.द.वि.स कलम- ३०२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरचा गुन्हा गंभीर असल्याने गुन्हयाची माहिती मा.वरिष्ठांना देवुन त्यांचा मार्गदर्शनाप्रमाणे नमुद गुन्हयाचा तपास सुरु केला सदर गुन्हयातील आरोपीत नामे करीमउल्ला खान हा वारंवार सुलतानगंज, अलीपुर-पश्चिम बंगाल, नोएडा-दिल्ली येथे त्याचे अस्तित्व लपवित होता. नवघर पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने कौशल्यपुर्ण व तांत्रिक तपास करुन आरोपीत नामे करीमउल्ला खान यास सुलतानगंज, पश्चिम बंगाल येथुन दिनांक ०९/०३/२०२४ रोजी नवघर पोलीस ठाणेच्या पोलीसांनी ताब्यात घेतले. नमुद आरोपीत नामे करीमउल्ला खान व मयत नामे मोहम्मद मुबारक अली यांच्यामध्ये ४५००/- रुपयांवरुन वाद होवुन दोघांमध्ये भांडण झाले होवुन भांडणात मोहम्मद मुबारक अली यास मारहाण केलेबाबत कबुली दिली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो.नि. अशोक कांबळे (गुन्हे) करत आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी, सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पो.नि.अशोक कांबळे (गुन्हे) सपोनि/संदिप पालवे, विशाल धायगुडे, पोउनि/ज्ञानेश्वर आसबे, पोहवा/०६११७ संतोष पाटील, पोह-०७०९७/भुषण पाटील, सुरेश चव्हाण, नवनाथ घुगे, पोशि-१३११८/ओंकार यादव, सुरजसिंग घुनावत मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

